CMYK

बीड । सोमवार

३०.०६.२०२५

वर्षे : ५ अंक : ९०

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● https://marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१







# नगरपालिकेचे बांधकाम अभियंता किरण देशमुख कार्यालयात दाखवा; एक लाख बक्षीस मिळवा !

## खाजगी कार्यालयात बसून कारभार ; रुजू पासून नगरपालिकेची सीसीटीव्ही तपासा ! राजू गांधी चौकातील खाजगी कार्यालय तपासल्यास ट्रक भरून नगरपालिकेचे कागदपत्र मिळतील !

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिका हा भ्रष्टाचाराचा केंद्रबिंदू ठरत आहे. नगरपालिकेचा कारभार बे भरोसे सुरू आहे मुख्याधिकारीच कार्यालयात येत नसल्याने कर्मचाऱ्यावरही कोणताच अंकुश नसल्याचे चित्र बीड नगरपालिकेत दिसून येत आहे. शहरातील विकास कामांना गती देण्याचे काम असणारा बांधकाम विभाग नेहमीच चर्चेचा विषय ठरत असतो. या ठिकाणी बांधकाम अभियंता पदावर कार्यरत असणारे किरण देशमुख हे बीड नगरपालिकेत रुजू झाल्यापासून किती वेळा व किती दिवस कार्यालयात बसून कामकाज पाहतात हा चर्चेचा विषय असून. बीड नगरपालिकेचा सर्व कारभार राजीव गांधी चौकातील खाजगी कार्यालयात बसून हाकण्याचा धंदा किरण देशमुख गेल्या अनेक दिवसांपासून करत आहे. या कार्यालयाची झाडाझडती घेतली



असता या ठिकाणी ट्रक भरून नगरपालिकेच्या कामांच्या संचिका मिळून येतील अशी चर्चा शहरात होत असून बांधकाम अभियंता किरण देशमुख यांना कोणाचे वरदहस्त आहे.

बीड नगरपालिका येथे कार्यरत असणारे कार्यकारी अभियंता किरण देशमुख हे बीड नगरपालिकेत रुजू झाल्यापासून कार्यालयात कधीही हजर नसतात त्यांना भेटण्यासाठी त्यांच्या खाजगी कार्यालयात जावे लागत असल्याची चर्चा यापूर्वी अनेक वेळा होती. देशमुख साहेब नेहमीच कामात एवढे व्यस्त असतात की सामान्य गुत्तेदारांना भेटण्यासाठी त्यांना वेळच नसतो नगरपालिकेच्या कामात एवढे व्यस्त असतात की आपल्या खाजगी कार्यालयात दिवस रात्र कामे करण्यास ते व्यस्त असतात. मात्र आपल्या मूळ कार्यालयात काम करण्यासाठी त्यांना कशाची अडचण असते हे मात्र गुलदस्त्यात आहे. राजीव गांधी चौकातील त्यांच्या खाजगी कार्यालयात नगरपालिकेच्या सर्व फाईल व्यवस्थित ठेवण्यात आले आहेत मात्र प्रश्न येथे खाजगी कार्यालयात शासकीय फायली

▶▶ उर्वरित पान २ वर

### ● तीन दिवसात तीन कोटीचे बिले निघाली

**बीड नगरपालिकेच्या नगरपालिका फंडातून मागील आठवड्यात तीन कोटींची बिले विविध मजूर सोसायटीच्या नावे निघाली आहेत. या बिलात मोठ्या प्रमाणात बोगसगिरी झाल्याची चर्चा आहे. बिले काढताना कोणाचा किती हिस्सा हा ठरलेला असून या बिलामागे संस्था मालक गुत्तेदार व अधिकारीही तेच असल्याची चर्चा होत असून मागील जून ते एप्रिल पर्यंत तब्बल २५ कोटींची बिले निघाली आहेत तर फक्त तीन दिवसात तीन कोटी रुपयांची बिले नगरपालिका फंडातून काढण्यात आली असल्याची शहरात चर्चा होत असून आपल्या खाजगी कार्यालयात बसून ही बिले काढली आहेत का असा सवाल उपस्थित होत असून खाजगी कार्यालयची चौकशी नगरपालिका प्रशासन करणार का ?**



# मराठा आरक्षणासाठी 29 ऑगस्टला मंत्रालयावर मोर्चा

## अंतरवाली सराटीत मनोज जरांगे पाटलांची घोषणा

**बीड । प्रतिनिधी**

रविवार दिनांक २९ जून रोजी अंतरवाली सराटीत मराठा समाजाच्या झालेल्या बैठकीत मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी समाजासोबत झालेल्या बैठकीत अंतिम लढायचा निर्णय घेतला आहे. येत्या २९ ऑगस्ट रोजी मुंबई येथे मंत्रालयावर मोर्चाचे आयोजन करण्यात आले असल्याचे पाटील यांनी म्हटले आहे. ही शेवटची लढाई असून दोन वर्ष आरक्षणाची वाट पाहिली मात्र आता मुंबई जाम करावी लागणार हा मराठ्यांच्या अस्मितेचा प्रश्न असून ही निर्णायक लढाई असल्याचे पाटील यांनी म्हटले आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या अनेक घडामोडी घडत आहेत. शालेय शिक्षणात इयत्ता पहिलीपासूनच्या हिंदी सक्तीच्या विरोधात एकीकडे विरोधक आक्रमक झाले आहेत.



विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन सुरु होणार आहे. तर दुसरीकडे मराठा नेते मनोज

▶▶ उर्वरित पान २ वर



# नराधम प्राध्यापक विजय पवार व प्रशांत खाटोकर यांना स्थानिक गुन्हे शाखेने ठोकल्या बेड्या

## सकाळी मांजरसुंबा येथून दोघांना अटक ; न्यायालयाने सुनावली दोन दिवसाची पोलीस कोठडी

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील उमाकिरण हॉल येथील कोचिंग क्लासेस मध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन मुलीची प्रा.विजय पवार व खाटोकर याने वर्षभरापासून शारीरिक व मानसिक छळ केल्याने पीडित मुलींनी घडलेला प्रकार पालकांना सांगितल्यावर दोन्ही प्राध्यापकावर शिवाजी नगर



पोलिस ठाण्यात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यापासून पवार व खाटोकर हे फरार झाले होते परंतु काल पहाटे त्या दोघांना स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने बीड नजीक रात्री उशिरा अटक केली. दोघांनाही न्यायालयात हजर केले असता दोन दिवसाची पोलीस कोठडी न्यायालयाने सुनावली. अल्पवीन मुलीला वर्षभरापासून हे दोघे जाणीवपूर्वक त्रास देत होते तिच्या शरीराला हात लावत तिला कपडे काढून फोटो काढले गेले असे देखील तिने तक्रार दिली होती.हा सगळा प्रकार उघडकीस आल्यानंतर या दोघांविरुद्ध पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल झाला होता घटनेचे गांभीर्य

▶▶ उर्वरित पान २ वर

# अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार प्रकरणी एस आय टी चौकशीची धनंजय मुंडे यांची मागणी

## अशा नीच नराधमांना व त्यांना मदत करणाऱ्यांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, यासाठी प्रयत्न करणार : धनंजय मुंडे

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या उमाकिरण शैक्षणिक संकुलात घडलेला प्रकार दुर्दैवी व संतापजनक आहे. यातील आरोपी विजय पवारला राजकीय बळ आहे, बीडचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या आश्रयाने व वरदहस्ताने या लोकांची इथपर्यंत मजल गेली आहे. या प्रकरणी व्यवस्थित तपास होऊन याधीही असे गुन्हे या लोकांनी केले आहेत का, याची सविस्तर चौकशी होणे अपेक्षित आहे, म्हणून आपण या प्रकरणी एस आय टी चौकशीची राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



तसेच उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे मागणी करणार असल्याचे माजी मंत्री, आमदार धनंजय मुंडे यांनी आज बीड येथे पत्रकारांशी संवाद साधताना म्हटले आहे. हा प्रकार गेल्या वर्षभरापासून सुरू होता, त्या अल्पवयीन भगिनी ने जी अत्याचार सहन केला, त्याची पीडा ती स्वतः व तिचे पालकच समजू शकतात.

मात्र या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतरही आरोपी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या सोबत होते, अशी माहिती मिळाली आहे. त्यांचे संबंध नेमके कशाचे आहेत? हे संबंध आर्थिक आहेत की आणखी काही असा घणाघात आ.धनंजय मुंडे यांनी केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची महिला आयपीएस अधिकार्यामार्फत एसआयटी नेमून चौकशी केली जावी ▶▶ उर्वरित पान २ वर



# गुटख्याचे पोते घेऊन जाणारी कार पकडली

**चकलांबा । प्रतिनिधी**

पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी अवैध धंद्यावर कठोर कारवाईचे आदेश दिले असून चकलांबा पोलिसांनी मागच्या काही दिवसांपासून कारवाईची मोहीम जोरदार राबविण्यास सुरुवात केली आहे.जुगार अड्डे,वाळूचे टॅक्टर,हायवा ताब्यात घेण्याची कारवाई केल्यानंतर आता एका कारमधून गुटख्याचे पोते पोलिसांनी सापळा रचून ताब्यात घेतले.यात ४ लाख ८३ हजारांचा

▶▶ उर्वरित पान २ वर

# वक्फ विधेयकाच्या विरोधाचा बीड ठरला केंद्रबिंदू

**बीड । प्रतिनिधी**

वक्फ दुरूस्ती विधेयक संशोधन २०२५ केंद्र सरकारने लागू केलेला आहे. मात्र हे दुरूस्ती विधेयक आम्हाला मान्य नसून ते आम्ही रिजेक्ट करून त्याचा निषेध करत आहोते. हा कायदा केवळ मुस्लीम समाजाच्याच विरोधात नाही तर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहीलेल्या संविधानाच्या विरोधात आहे. केंद्र सरकारनेहा कायना रद्द केला नाही तर संपूर्ण भारतात मुस्लीम समाजच नव्हे तर सर्व समाज मिळून जे

▶▶ उर्वरित पान २ वर

- जिल्हाभरातून मुस्लिम समाज मोठ्या संख्येने दाखल
- बीडमधून मुस्लिमांचा वक्फ विरोधात इन्कलाब
- वक्फ विधेयक पाठीमागे घ्या ; नसता दिल्ली जाम करणार
- मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डचा बीडमधून केंद्राला इशारा





CMYK

# राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन फलदायी ठरो

राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन आजपासून सुरु होत आहे. नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर पार पडणाऱ्या या पावसाळी अधिवेशनात सरकारवर आरोपांचाच पाऊस पडण्याची अधिक शक्यता आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफी, अवकाळी पावसामुळे वाया गेलेल्या शेतपिकांची नुकसानभरपाई, शक्तिपीठ महामार्गाला ठिकठिकाणी होत असलेला विरोध, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लांबल्यामुळे पावसाच्या आरंभी शहरांची झालेली दुर्दशा, रस्त्यांवरील खड्डे, पुण्यातील वैष्णवी हगवणे यांचा हुंडाबळी, राज्यातील स्त्री अत्याचाराचा वाढत आलेख, लाडक्या बहिणींना वाढीव पैसे केव्हा मिळणार ?, पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रासह देशातील २६ पर्यटकांची झालेली हत्या, पुण्यातील इंद्रायणी नदीवरील पूल कोसळण्याची घटना आणि सध्या गाजत असलेला विषय म्हणजे शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषेची सक्ती या सर्व प्रश्नांवर विद्यमान मंत्र्यांना घेरण्याची पुरती तयारी विरोधी पक्षांनी केली आहे. अर्थात हे सर्व अपेक्षितच असल्याने सरकारमधील संबंधित मंत्री आणि मुख्यमंत्री यांनीही या सर्व प्रश्नांना उत्तरे देण्याची तयारी केली असेलच.



राज्यातील सामान्य जनतेच्या प्रश्नांवर आणि समस्यांवर सत्ताधारी आणि विरोधी पक्ष यांनी एकत्रितपणे सारासार चर्चा करून त्यावर ठोस उपाययोजना काढण्याच्या दृष्टीने भरवण्यात येणाऱ्या अधिवेशनांच्या एकूण कालखंडात साधक-बाधक चर्चा नेमकी किती काळ होते ? अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासूनच विरोधी पक्षाची मंडळी अधिवेशन चालू न देण्याच्याच तयारीत असतात. जनतेचे कोणते प्रश्न सभागृहात मांडायचे यापेक्षा सरकारला कोंडीत कसे पकडायचे यामध्येच यांना अधिक स्वारस्य असते. सभागृहाच्या प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन करणे, अधूनमधून सभात्याग करणे, चर्चेच्या कालावधीत आरडाओरड आणि घोषणाबाजी करत गोंधळ घालणे यांसारख्या प्रकारांमुळे अधिवेशन काळात सभागृहाला रणांगणाचे स्वरूप आलेले असते. यामध्ये गैरवरणुकीमुळे अनेकदा काही आमदारांचे निलंबन करावे लागते. मग पुन्हा निलंबन कसे नियमबाह्य आहे, विरोधी आमदारांचे निलंबन करून सरकार कसा जनतेचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहे, यासाठी पुन्हा सरकारविरोधात निदर्शने, घोषणाबाजी केली जाते. जनतेचे प्रश्न राहिले बाजूला एकमेकांची उणीधुणी काढण्यातच अधिवेशनाचे सूप वाजते.

अधिवेशनाच्या काळात सभागृहाला आलेले आखाड्याचे स्वरूप पाहता असा गोंधळ घालण्यासाठी आमदारांना आपण निवडून देतो का हा प्रश्न कोणत्याही सामान्य मतदाराला पडल्यावाचून राहात नाही. वर्षातून तीन वेळा ही अधिवेशने भरवली जातात. प्रत्येक अधिवेशनासाठी सरकार कोट्यवधी रुपये खर्च करते. कष्टकरी सामान्य जनतेच्या घामाच्या मिळकतीतून कररूपाने सरकार दरबारी जमा होणारा हा पैसा असतो. त्याचा विनियोग व्हायला नको का ? सामान्य नागरिकांवर ओढवलेल्या नैसर्गिक आणि कृत्रिम संकटांवर सरकारने योग्य तो मार्ग काढावा, सामान्य जनतेच्या मूलभूत गरजा पुरवण्यात येणाऱ्या अडथळ्यांवर उपाययोजना काढाव्यात, विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा मिळाव्यात, युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, राज्यात कायदा आणि सुव्यवस्था यांचे पालन व्हावे. स्त्रियांचे रक्षण व्हावे, सरकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचाव्यात, आरोग्य व्यवस्थेबाबत सुसूत्रता असावी , एखाद्या गंभीर मुद्याबाबत स्वतंत्र कायदा करण्याची आवश्यकता असल्यास त्याबाबत विचारविनिमय घडवून आणणे, प्रचलित कायद्यात काही सुधारणा करायची असल्यास त्यावर सविस्तर अभ्यास करणे आणि या सर्वांच्या सुयोग्य नियोजनासाठी एकमेकांची मते जाणून घेणे यासाठी अधिवेशन ही संधी असते ; मात्र या संधीकडे सरकारला नामोहरम करण्याची पर्वणी म्हणून पहिले जात आहे. हे केवळ राज्यात घडते असे नव्हे. संसदेच्या प्रत्येक अधिवेशन काळातही हीच प्रथा राबवली जाते. गेल्या काही वर्षांतील या अधिवेशनांची फलश्रुती पाहता ती नगण्यच आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सभागृहातील गोंधळ थांबवताना आणि आमदारांना शिस्तीचे धडे देताना सभागृहाच्या अध्यक्षांचा कस लागतो, त्यांना नाहक मनस्ताप सहन करावा लागतो, काहीवेळा तर गोंधळ थांबवण्यासाठी पोलिसांनाही पाचारण करावे लागते. यापुढेही अधिवेशन काळात हेच घडणार असेल तर ही खर्चिक अधिवेशने हवीत तरी कशाला ?

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

पान १ वरून पुढे...

## नगरपालिकेचे बांधकाम...

कशा ? कोणत्या आधारे कार्यकारी अभियंता देशमुख हे खाजगी कार्यालयातून कारभार पाहतात नगरपालिकेत येण्यासाठी त्यांना वेळ नाही का नगरपालिकेचे कार्यालय त्यांच्यासाठी योग्य नाही का मुख्याधिकारी या देशमुखांना जाब विचारत नाहीत का ? असे अनेक प्रश्न उपस्थित होत असून बीड नगरपालिकेत मागील अनेक महिन्यापासून बोगस बिलेट काढण्याचा सपाटा सुरू आहे. यासाठी खाजगी कार्यालयाचा वापर होत आहे का ? बांधकाम अभियंता किरण देशमुख हे बीड नगरपालिकेत कधी येतात व कधी कामे करतात हा संशोधनाचा विषय असून खाजगी कार्यालयात मात्र सर्वच कामे केली जातात. शासकीय कर्मचारी असताना खाजगी कार्यालय थाटणाऱ्या किरण देशमुखांची चौकशी होणार का ?

## मराठा आरक्षणासाठी...

जरांगे पाटील पुन्हा एकदा मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन आक्रमक होताना दिसत आहेत. मनोज जरांगे यांच्याकडून सातत्याने मराठा आरक्षणासाठी उपोषण आणि आंदोलने करण्यात आली आहे. त्यांच्या काही मागण्यांना सरकारने मान्यता दिली असली तरी त्यांचं पुरेसं समाधान झालेलं नाही.मराठा आरक्षणाच्या आंदोलनाची दिशा ठरवण्यासाठी आज अंतरवली सराटीत बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीला मोठ्या संख्येत मराठा समाजाचे आंदोलक जमले होते.या बैठकीवेळी मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टला मुंबई गाठायची अशी घोषणा केली. २७ ऑगस्टला निघायचं आणि न थांबता २ दिवसांत मुंबईत जायचं, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले आहेत.

## नराधम प्राध्यापक...

ओळखून पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी स्थानिक गुन्हे शाखेसह इतर पोलीस ठाण्याचे पाच पथके आरोपींच्या शोधासाठी रवाना केली होती. बीड शहरातील सामाजिक कार्यकर्त्यांनी व संघटनानि उमाकिरण शैक्षणिक संकुल समोर आंदोलन करत आरोपींच्या अटकेची मागणी केली होती तसेच आरोपी अटक न झाल्यास सोमवारी बीड बंदचे आवाहन करण्यात आले होते. यामुळे पोलिसावर वाढता दबाव लक्षात घेता पोलिस अधीक्षक यांनी तपासाची गती अधिक वाढवून पहाटे दोन्ही प्राध्यापकांना ताब्यात घेतले. बीड स्थानिक गुन्हे शाखेला माहिती

पान १ वरून पुढे...

मिळाली की विजय पवार हा नगरहून लिंबागणेश मार्गे त्याच्या चारचाकी सफारी गाडीतून मांजरसुंबा येथे येणार शनिवारी रात्री दोन वाजताच्या सुमारास विजय पवारला लिंबागणेश येथे ताब्यात घेतले.तर प्रशांत खाटोकर हा धाराशिव येथून पुण्याकडे मांजरसुंबा मार्गे पवारच्या सोबत जाणार असल्याने त्याला ताब्यात घेतले.पोलिसांनीं सापळा रचून या दोघांना पहाटे चार वाजण्याच्या सुमारास ताब्यात घेण्यात आले. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक खटावकर, महेश विघ्ने, श्रेणी पोउपनि सुर्यकांत गुळभिले, पोलीस अंमलदार म हेशर जोगदंड, अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, सुनिल अलगट व सिद्धार्थ मांजरे यांनी केली.

## अल्पवयीन मुलीवर...

असेही आ.धनंजय मुंडे म्हणाले. बीडच्या उमाकिरण शैक्षणिक संकुलात घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर आ.धनंजय मुंडे यांनी रविवारी माध्यमांशी संवाद साधला. उमाकिरण मध्ये एक प्रकार सम ोर आलाय मात्र अशा अनेक घटना घडलेल्या असाव्यात असा संशय असल्याचे आ.मुंडे म्हणाले. कमी शुल्काचे आमिश दाखवून विद्यार्थ्यांना वाममार्गाला लावण्याचा प्रकार विजय पवार व त्याच्या सहकार्याच्या माध्यमातून होत होता असा दावाही आ.धनंजय मुंडे यांनी केला आहे. आरोपी विजय पवार, प्रशांत खटोकर यांना हे सर्व करता आले त्यामागे त्याला राजकीय आश्रय होता. गुन्हा दाखल झाला त्या दिवसाचे दोन आरोपी आणि त्या पाठबळ देणार्यांचे सीडीआर काढावेत असे आव्हान देखील आ.धनंजय मुंडे यांनी पोलीस प्रशासनाला दिले. पोलीस ज्या पद्धतीने हा तपास करत आहेत त्या पद्धतीने आरोपीला शिक्षा होईल असे वाटत नाही त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी महिला आयपीएस अधिकार्यामार्फत एसआयटी गठीत करून व्हावी अशी मागणी आपण मुख्यमंत्र्यांकडे व दोन्हीही उपमुख्यमंत्र्यांकडे करणार आहोत असेही आ.मुंडे म्हणाले. तत्पूर्वी मुंडे यांनी पोलीस अधीक्षक नवनीत तसेच या प्रकरणात नियुक्त तपास अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून चर्चा करून सुरू असलेल्या तपासाची चौकशी केली. अशा नीच वृत्तीच्या लोकांनी असे किती गुन्हे याआधी केलेत तेही उघड होऊन यांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, तसेच खाजगी कोचिंग क्लासेस चालकांना फी वसुली सह

पान १ वरून पुढे...

सुरक्षेच्या दृष्टीने शासनाकडून एक संहिता लागू असावी, याबाबत आपण प्रयत्न करणार असल्याचे धनंजय मुंडे म्हणाले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर, फारुक पटेल, ॲड. गोविंद फड, दादासाहेब मुंडे, भागवत तावरे, यांसह याप्रकरणी आंदोलन पुकारलेले पालक व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

## गुटख्याचे पोते...

मुद्देमाल जप्त करण्यात आला. चकलांबा पोलीस ठाण्याचे सपोनि संदीप पाटील यांना गुप्त माहिती मिळाली होती की एका कारमधून गुटख्याची वाहतूक होणार आहे.त्यानुसार नगर -बीड यांच्या सीमेवर असणाऱ्या गोगस पारगाव येथे सापळा रचून अंधारात वाट बघत बसलो संशयित वाहन येताच तात्काळ रस्त्यावर बॅरिगेट्स आडवे लावून सदरचे वाहन अडविले व त्याची तपासणी केली असता कार क्रं. चक१२ टथ २१६२ मध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटख्याचे चार मोठे पोते आढळून आले आहेत.याप्रकरणी गाडी चालक शिवाजी मारोती बटूळे वय ४३ रा. भरजवाडी ता. पाथर्डी, जिल्हा अहिल्यानगर यांचे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून या कारवाईत ४ लाख ८३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.ही कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत,अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर,पोलीस उपअधीक्षक श्री.राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप पाटील किरण मिसाळ प्रशांत घोंगडे , खटाणे अर्जुन, थापडेआदींनी केली आहे.

## वक्फ विधेयकाच्या...

संविधान प्रेमी लोक आहेत त्यांना सोबत घेऊन जंतर-मंतरवर लोकशाही मार्गाने आंदोलन करून आणि दिल्ली जाम करू असा इशारा परभणी येथील मौलाना रफीयोद्दीन अशरफी यांनी दिला. तर जोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय येत नाही तोपर्यंत वक्फ पोर्टलवर रजिस्टर्ड करू नका असे आवाहन ऑल इंडिया पर्सनल लॉ बोर्डाचे प्रवक्ते कासीम रसुल इलियास साहब यांनी केले.

बीड येथील मोमीनपुरा बायपास रोडवरील इज्तेमागाह मैदानावर निषेध मोर्चासाठी बीड जिल्ह्यातून नव्हे तर मराठवाड्यातून मुस्लिम समाज मोठ्या संख्येने या निषेध मोर्चात सहभागी झाला होता. यावेळी आलेल्या धर्मगुरूंनी केंद्र सरकारवर गंभीर ताशेर ओढले. मुस्लिमांना टार्गे ट करण्यात येत आहे देशात काही ठराविक जातीयवादी फक्त मुस्लिम

पान १ वरून पुढे...

समाजाला टारगेट करत आहे. चे देशातील विविध घटनांनी पुढे आले आहे. यातच केंद्राने वक्फ बोर्डाच्या कामात हस्तक्षेप करत थेट विधेयक मंजूर केले आहे यामुळे विविध दर्गा मज्जित यासह इनामी जमिनीवर गदा येणार आहे. भारतीय संविधानानुसार प्रत्येक भारतीय ला आपला धर्म व आपली परंपरा जोपासण्याचा स्वातंत्र्य देण्यात आला आहे. संविधानाच्या मूळ उद्देशाला हरताळ फासण्याचे काम केंद्र सरकार करत आहे. या अन्यायाविरोधात मुस्लिम पर्सनल लॉ मैदानात उतरले असून समाजात जागृती निर्माण करण्यात येत आहे. बीड शहरातून इन्कलाब ची सुरुवात झाली असून देशभरात मुस्लिम पर्सनल लॉ सभा व निषेध मोर्चे आयोजित करणार आहे यातच केंद्र सरकारचे डोळे न उघडल्यास दिल्ली जाम करण्यात येणार असल्याचा इशारा मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाकडून या निषेध मोर्चा देण्यात आला.

ऑल इंडिया मुस्तीम पर्सनल लॉ बोर्ड देशातील मुस्लीम सम ाजासोबत आहे, त्यामुळेव ऑल इंडिया पातळीवर कार्यक्रम आयोजीत करून लोकशाही मार्गाने वक्फ दुरूस्ती विधेयकाचा निषेध करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. हा कायदा येथील मुस्लीम समाजासह इतर अल्पसंख्यांक, आदिवासी, ओबीसी समाज, दलित समाजासाठी अनपेक्षित आहे. या प्रकरणात सध्या सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. सदरील कायद्यासंदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ट असतांना केंद्र सरकारने वक्फ पोर्टलच्या माध्यमातून सर्व वक्फ प्रॉपर्टीज रजिस्टर्ड करा असे आवाहन करणे योग्य नाही. ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाच्या वतीने सर्व मुस्लीम समाजाला संदेश देण्यात आला असून जोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय येत नाही तोपर्यंत वक्फ पोर्टलवर कोणतीही प्रॉपर्टी रजिस्टर्ड करू नका. आम्ही हे दुरूस्ती विधेयक पुर्णपणे रिजेक्ट करत आहोत. हे दुरूस्ती विधेयक वक्फ प्रॉपर्टीच्या विरोधात आहे. वक्फ प्रॉपर्टी सरकारची नसुन ती प्रॉपर्टी आमच्या पुर्वजांनी म स्जीद, कब्रस्तान, दर्गाह, इदगाह, खानखाह आणि चॅरिटेलबल काम ासाठी दिलेली आहे. त्यामुळे या प्रापर्टीवर वक्फ बोर्डाने ताबा केलेला आहे, वक्फमध्ये भ्रष्टाचार आहे अशा प्रकारचा भ्रम निर्माण केला जात असल्याचा आरोप ऑल इंडिया पर्सनल लॉ बोर्डाचे प्रवक्ते कासीम रसुल इलियास साहाब यांनी केला.

या निषेध मोर्चासाठी लाखोंच्या संख्येने मुस्लिम समुदाय एकत्रित आला होता बीड शहर हे वक्फ विधायकाच्या आंदोलनाचा केंद्रबिंदू ठरला.

पान ४ वरून पुढे...

## कोळगांव बायपास...

वर बीड-पाथर्डी-नगर ला जाणार्या बायपास वर एकलव्य चौकाची स्थापना करण्यात आली त्या वेळी समाज एकीचा नारा देण्यात आला त्या वेळी प्रमुख उपस्थिती महाराष्ट्र कार्याध्यक्ष ॲड. सुर्यकांत दशरथ पवार, दंडनायक ग्रुप महा सचिव बलराज पवार,मा भाऊसाहेब शिंदे, बजरंग शिंदे,बबन शिंदे,विलास नेमाने सिध्दू करांडे,नाना बांगर व समाज बांधव मोठ्या संखेने उपस्थित होते

## बेलेश्वर संस्थानच्या...

पुष्पहार, रांगोळ्या ,पायघड्या व सुवासिनींनी औक्षण करून मंदिरापर्यंत सवाद्य मिरवणूक काढत त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी सरपंच बाळासाहेब जाधव ,उपसरपंच बाळकृष्ण थोरात ,कल्याण वाणी, पांडुरंग वाणी,अनंतकाका मुळे, बाजीराव दशमे,विक्रम दाभाडे, शिवहरी कोटुळे, संतोष भोसले, अभिजित गायकवाड, भगवान मोरे,दादा गायकवाड, अर्जुन घोलप, रामदास म ुळे, हरिओम क्षीरसागर आणि डॉ.गणेश ढवळे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

पान ४ वरून पुढे...

## आष्टी तालुका...

येथील हभप काका महाराज मुखेकर व वारकऱ्यांनी युवा पत्रकार संघाच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. सेवा हाच परमेश्वराचा मार्गया भावनेतून आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने सामाजिक सेवेच्या अनेक कार्यक्रमांचा भाग म्हणून वारकऱ्यांना अल्पोपहार वाटप करण्यात आले तर हा उपक्रम पुढील वर्षीही अशाच प्रकारच्या सेवाभावी कार्यक्रम ांचे आयोजन करण्याचे संघाचे मनोधारण असल्याचे अध्यक्ष अविनाश कदम यांनी सांगितले

## शिवसैनिकांकडून हिंदी...

शैक्षणिक हिंदी धोरणाच्या नावाखाली राज्य सरकारने पहिलीपासून हिंदी भाषेची सक्ती महाराष्ट्रात करण्याचा निर्णय नुकताच जाहीर केला. या सक्ती मुळे मराठी भाषिकांची मने दुखावली गेली. मराठी भाषेचे स्थान दुय्यम होणार. महाराष्ट्रातच मराठी भाषेचा होणारा अपमान मराठी भाषिक सहन करणार नसल्याचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम म्हणाले. आज या सरकार ने जो हिंदी सक्तीचा आदेश काढला त्याच आदेशाची होळी करून शिवसैनिकांनी निषेध नोंदवला यावेळी महिला संघटिका मीराताई नवले,

पान ४ वरून पुढे...

महिला आघाडी जिल्हाप्रमुख प्रमिलाताई माळी, जिल्हा समन्वयक संजय महाद्वार, उपजिल्हाप्रमुख राजू महुवाले, युवासेना जिल्हाप्रमुख बबलू दिवे, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, कामगार सेना रवी वाघमारे, नवनाथ प्रभाळे, पंकज कुटे, महादेव परसकर, अक्षय काशिद, सतीश परदेशी, सतीश मस्के, दिलीप पवार, गणेश लोणकर, रंगनाथ पैठणकर, प्रतीक वाघमारे, प्रेम ताकतोडे, रमेश नवले, बलराज कोटुळे, अशोक गायकवाड, जमदाडे, नंदू घोगरे, संजय कुऱ्हाडे आदी शिवसैनिक मोठ्या प्रमाणवार उपस्थित होते.

## प्रमिलादेवी पाटील...

संयुक्त राष्ट्रांच्या १९३ देशांपैकी १७५ देशांचे सहप्रतिनिधींनी या प्रस्तावाला पाठींबा दिला होता आणि डिसेंबर २०१४ मध्ये या दिनाला मान्यता देण्यात आली. २१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिवस जगभर साजरा करण्यात आला. या निमित्ताने महाविद्यालयात जागतिक योग सप्ताह प्राचार्य डॉ. ढास डी. के यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २१ ते २६ जून कालावधीत घेण्यात आला. या सप्ताहला महाविद्यालयीन प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

पान ४ वरून पुढे...

## शिवसेना वर्धापन...

वाटप करण्यात आले. यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना तालुका प्रमुख संतोष जाधव यांनी सांगितले की, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या संस्कारातून प्रेरणा घेत आम्ही शिवसैनिक समाजसेवेचं कार्य प्रामाणिकपणे पार पाडत आहोत. उपमुख्यमंत्री तथा शिवसेना प्रमुख सन्माननीय एकनाथजी शिंदे व संसदरत्न खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांची सामान्यांसाठीची तळमळ व महाराष्ट्राच्या हितासाठीची कार्यशैली आम्हाला नेहमीच प्रेरणादायी ठरली आहे. जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी संपूर्ण आयुष्य समाजकार्यात झोकून दिले आहे. त्यामुळे यावर्षी वर्धापन दिन फलकबाजी न करता समाजोपयोगी कार्य करून साजरा केला आहे. यावेळी शिवसेना जिल्हा संघटक सुनील सुरवसे, संचालक बाजार समिती तथा शिवसेना जिल्हा सह समन्वयक दीपक काळे, उपजिल्हा प्रमुख अमोल जाधव, अभिमन्यू घरत, आनंद पिंगळे, पंकज शेळके, विवेक सवाई यांच्यासह सर्व शिवसैनिक, शिक्षकवृंद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवसैनिकांनी शालेय विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन केलेल्या सहकार्याबद्दल शाळेतील शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी बीड जिल्हा शिवसेनेचे आभार मानले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com



फलटन मुकामी पालखी तळावरील आरती समयी वैष्णवांचा मेळा (छायाचित्र कमलेश विनोदे)



# नाईक वस्ती येथील सिमेंट कॉंक्रिट रस्ता व नालीच्या कामाचे उद्घाटन

## शहराच्या विकासासाठी शिवछत्र परिवार कधी मागे हटणार नाही: रणवीर पंडित यांचे प्रतिपादन

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरात नगरपरिषदेच्या माध्यमातून अनेक विकासाची कामे सुरू आहेत,नगरपरिषदेच्या वतीने विविध पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. शहरातील प्रभाग क्रमांक ७मधील नाईक वस्ती वैजनाथ मोरे यांचे घर व दिलीप मोरे यांच्या घरापर्यंत या भागात विशेष रस्ता अनुदान योजनेंतर्गत दहा लक्ष रुपयाच्या रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रिटीकरण आणि नाली कामाचे उद्घाटन दि. २९ जुन रविवार रोजी सायंकाळी साडेपाच वाजता युवा नेतृत्व रणवीर काका पंडित यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी युवा नेते रणवीर पंडित म्हणाले की, माजी आमदार अमरसिंह पंडित व विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून गेवराई शहरासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून शहरात विविध ठिकाणी विकासाची कामे केली जात आहेत. विशेष रस्ता अनुदान योजनेंतर्गत प्रभाग क्रमांक सात या भागातील अंतर्गत रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरण व नाली कामाचे उद्घाटन झाल्याने कामाला सुरुवात झाली आहे. गेल्या अनेक वर्षापासून आपल्याकडे सत्ता नसल्यामुळे आपण विकास कामे करू शकलो नाहीत पण विधानसभेच्या रणांगणात आपण विजय झाल्याने आपल्याला विकास कामाची संधी मिळाली आहे त्यांचा फायदा गेवराई शहराच्या विकासासाठी यापुढे करणार आहोत सत्ता नसल्यावर कुठल्याही कामे पूर्ण होण्यास विलंब लागत होता पण् आता पालकमंत्री अजितदादा आणि आमदार विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून आपण शहरात विकास कामाचा अनुशेष भरून काढत आहोत यांचा मला मनापासुन आनंद झाला. शिवछत्र परिवार कधी मागे हटणार नाही असे प्रतिपादन रणवीर काका पंडित यांनी केले आहे यावेळी नाईक वस्ती येथील नागरिक उपस्थित होते.

# हिंदी भाषा सक्तीचा जी.आर.ची परळी ठाकरे पक्षाकडून होळी

**परळी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारने पहिलीपासून लहान बालकांना शिक्षण संस्थेमध्ये हिंदी विषयाची सक्तीचा जी.आर .काढल्यामुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने हिंदी सक्तीचा जी.आर.ची होळी परळी येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकट करण्यात आली. शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांचे आदेशाने महाराष्ट्र शासनाने लहान बालकावर पहिली वर्गापासून हिंदीची सक्ती करून अन्याय करीत आहे.

महाराष्ट्राची मातृभाषा मराठी विषय परिपक्व झाल्याशिवाय पाचवीपासून वेग वेगले विषय मुलांना देण्यात यावे. महाराष्ट्र सरकारने हिंदी सक्तीचा काढलेला जी.आर .त्वरित रद्द करा. अशा घोषणा देऊन शिवसेना उपजिल्हाप्रमुख नारायणराव सातपुते शिवसेना तालुकाप्रमुख भोजराज पालीवाल शिवसेना शहर प्रमुख राजेश विभूते शिवसेना विधानसभा प्रमुख जगन्नाथ साळुंखे शिवसेनेचे कार्याध्यक्ष विशाल गुट्टे शिवसेनातालुका संघटक सतीश जगताप शिवसेना उप तालुकाप्रमुख महेश केंद्रे शिवसेना तालुका सचिव प्रकाश साळुंखे शिवसेनेचे शाखा प्रमुख विजय जाधव शिवसेनेचे विभाग प्रमुख संतोष साखरे विशाल सुगरे इत्यादी शिवसैनिक व शाखाप्रमुख व शिवसैनिकांनी हिंदी सक्तीचा जी.आर.ची होळी केली.



# महाराष्ट्र शासनाचा समाज भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल राजू वंजारे यांचा जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने यथोचित सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

गतवर्षी महाराष्ट्र शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार आणि यावर्षी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे उत्कृष्ट संस्थेचा पुरस्कार निसर्ग सेवाभावी संस्थेचे संस्थापक येळंबघाट येथील रहिवासी असलेले जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात निस्वार्थ भावनेने समाजकार्यासाठी स्वतःला समर्पित केलेले राजू वंजारे यांचा राज्य सरकारने एक लक्ष रुपये देऊन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान केला. सलग दोन वर्ष मिळालेल्या या पुरस्कारामुळे बीड जिल्ह्याचे नाव महाराष्ट्रात उंचावल्याने जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करताना बीडचे निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, होम डिवायएसपी उमाकांत कस्तुरे, महापारेषण बीडचे कार्यकारी अभियंता वासुदेव लबासे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष विकास स्वामी, सचिव वैभव स्वामी यांच्यासह व्यासपीठावरील मान्यवर दिसत आहेत.



# अॅड. राज पाटील यांना पहाट फाउंडेशनचा राज्यस्तरीय आदर्श सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार प्रदान

### लढा दुष्काळाशी फाउंडेशनच्या कार्याचा थोर सन्मान

**वडवणी । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष आणि प्रख्यात सामाजिक कार्यकर्ते अॅड. राज पाटील यांना पहाट फाउंडेशनच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार शनिवारी प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार त्यांना गेल्या २५ वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल देण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर येथील पहाट फाउंडेशन ही सामाजिक कार्यात कार्यरत असलेली प्रतिष्ठित संस्था असून, ती दरवर्षी महाराष्ट्रभरातून समाजसेवेतील उत्कृष्ट कार्यकर्त्यांचा सन्मान करते. यंदा अॅड. राज पाटील यांच्या कार्याची दखल घेत त्यांना सन्मानित करण्यात आले. राज पाटील हे वडवणी तालुका विकास समिती, उतराई महोत्सव आणि लढा दुष्काळाशी फाउंडेशनच्या माध्यम ातून निसर्गसंवर्धन, जलसंधारण, शेती रस्ते, वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, तसेच कोरोना काळात गरजूंना अन्नधान्य व आरोग्यविषयक साहित्य पुरवण्याचे कार्य सातत्याने करत आहेत. त्यांनी आजपर्यंत हजारो वृक्षांचे वाटप केले असून, समाजात रक्तदानासह अवयव दान व म रणोत्तर देहदान जनजागृती सोबत, स्वतः ५० वेळा रक्तदान केले आहे, २७ वेळा रक्तदान शिबिर आयोजन व अवयव दान, मरणोत्तर देहदान फॉर्म भरला आहे. गावचे सरपंच म्हणून कार्य करताना त्यांनी सरपंच परिषदेचे जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून शेकडो सरपंचांच्या समस्या मांडून त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकऱ्यांसाठी, शेती रस्ते व जलसंधारणाच्या माध्यमातून मोठे काम उभे केले आहे. तसेच मराठा आरक्षणाच्या लढ्यातही गेल्या पाच वर्षांपासून त्यांचा सक्रीय सहभाग राहिला आहे.पुरस्कार वितरण सोहळा बुलढाणा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक भवन येथे शनिवारी दुपारी दोन वाजता अत्यंत थाटामाटात पार पडला. या वेळी इको फ्रेंडली व्हिलेजचे निर्माते तथा सलाई बनचे संस्थापक श्री. मनजीत सिंग सिख, लोणार-मेहकरचे आमदार सिद्धार्थ खरात, मिसेस इंडिया विजेत्या श्वेता परदेशी, बुलढाणा पत्रकार परिषदेचे जिल्हा अध्यक्ष रणजीत सिंह राजपूत, प्राचार्य हरीश साखरे, मोगरा फुलला फेम सचिन देवरे आणि कृषी समृद्धी फाउंडेशनचे महेंद्र सौभागे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.



दैनिक मराठवाडा पत्र — दि. २९/०६/२०२५

**टी. सी. हरवला आहे.**

राऊत ऋषिकेश बाबासाहेब या नावाचा १२ वी पास चा टी. सी. बीड पिंपळनेर प्रवासात हरवला आहे तरी सापडल्यास संपर्क करावा.

**संपर्क : ७३९१०००४९४**

दैनिक
● https://marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
सोमवार, दि.३० जून २०२५ पान ४

## कोळगांव बायपास येथे जिल्ह्यातील पहिल्या एकलव्य चौकाची स्थापना

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील पहिल्या एकलव्य चौकाची स्थापना सुमित्राताई पवार यांच्या पुढाकारामुळे कोळगांव बायपास येथे आदिवासी समाज बांधवांच्या उपस्थितीमध्ये स्थापना काल २६ जून २०२५ रोजी करण्यात आली. आदिवासी समाज एकीकरणासाठी सर्व संघटना प्रयत्नरथ असून आदिवासी समाजातील देव, म हापुरुष यांची ओळख चिरंजीव राहावी म्हणून सर्व संघटना प्रयत्न करत आहेत. याचाच एक भाग म्हणून गेली ४० ते ४५ वर्षापासून आदिवासी समाजात शिक्षण तसेच मागास पणा दुर करून चालु समाजाच्या वातावरणात आदिवासी समाजाने यावे या साठी आहोरात्र प्रयत्न करणार्या एकलव्य भिल्ल समाज संघटना महाराष्ट्र च्या संस्थापिका सौ सुमित्राताई दशरथ पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत कोळगाव रोड ▶▶ उर्वरित पान २ वर



# बेलेश्वर संस्थानच्या श्रीगुरु ईश्वरभारती पायी दिंडीचे पंढरपूर कडे प्रस्थान

## लिंबागणेश ग्रामस्थांच्या वतीने टाळमृदंगाच्या गजरात जंगी स्वागत





**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील मौजे बेलगाव येथील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान मठाधिपती प.पु.महंत महादेव भारती महाराज व ह.भ.प.शांतीब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांच्या मार्गदर्शनात बेलगाव येथील श्रीगुरू ईश्वरबाबा भारती पायी दिंडी सोहळा श्रीक्षेत्र पंढरपुरकडे आज दि.२९ रविवार रोजी सकाळी ११ वा.वारकऱ्यांनी टाळ मृदंगाच्या गजरात तल्लीन होत ग्यानबा तुकाराम गजर करत डोक्यावर तुळशीवृंदावन,हाती भगव्या पताका घेतलेले वारकरी अशा भक्तिमय वातावरणात आषाढी वारीसाठी रवाना झाली. दिंडीचे हे ३ रे वर्ष असुन पहिल्या वर्षी ४०० तर दुस-या वर्षी ११०० तर यावर्षी १५०० वारकरी सहभागी झाले होते.शेतशिवार हिरवेगार झाल्याने बळीराजा आनंदीत झाला असुन दिंडीत वारकऱ्यांची संख्या वाढली आहे.लिंबागणेश करांच्या वतीने आतिशबाजी करत सुवासिनींनी औक्षण करत मार्गावर ठिकठिकाणी रांगोळ्या काढत दिंडींचे जंगी स्वागत करण्यात आले.ईश्वरभारती मंदिरात महाप्रसादाची सोय करण्यात आली होती. बालाघाटावरील बेलेश्वर संस्थान प्रसिद्ध असुन पायी दिंडी सोहळ्याचे हे तिसरे वर्षं आहे. आज सकाळी २९ जुन रविवार रोजी सकाळी ११ वाजता बेलेश्वर संस्थान बेलगाव येथे दिंडी प्रस्थानावेळी पंचक्रोशीतील भाविक वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. लिंबागणेश येथील ईश्वरभारती मंदिरात महाप्रसाद - आषाढी एकादशीला विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपुरला जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी लिंबागणेश ग्राम स्थांच्या वतीने ईश्वर भारती मंदिरात महाप्रसादाची सोय केली होती. तत्पूर्वी गावच्या वेशीवर महंतांचे ▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड शहरातील राधाकृष्ण मंदिर येथे आज जगन्नाथ यात्रा निमित्त जगन्नाथाचा रथ व पूजा करण्यात आली यावेळी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे योगेंद्र यादव जी प्रभू बीड शहरातील भाविक भक्त महिला मंडळ इत्यादी उपस्थित होते.*

# आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने अमरापूर ते पंढरपूर दिंडीतील वारकऱ्यांना अल्पोपहार वाटप

## ह.भ.प. काका महाराज मुखेकर,ह.भ.प. उद्धव महाराज जाधव यांचे केले स्वागत

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने अमरापूर ते पंढरपूर दिंडीतील वारकऱ्यांना रविवार दि २९ जून रोजी दुपारी ४ वाजता आष्टी येथील डोईठाण रोडवरील शिंदेवाडी फाटा येथे प्रवास करणाऱ्या वारकऱ्यांसाठी चहा-बिस्किटांचे अल्पोपहार वाटप केले. ही मोहीम संघाच्या सामाजिक जबाबदारीचा भाग म्हणून आयोजित करण्यात आली होती. यावेळी भैरवनाथ पायीं दिंडी अमरापूर ते पंढरपूर



दिंडीतील ह.भ.प. काका महाराज मुखेकर,ह.भ.प. उद्धव महाराज जाधव यांचे आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समीर शेख, मारूती संत्रे,डिमोलेशन कॉन्ट्रॅक्टर अक्षय भोसले,गुलाब काकडे, राजेंद्र पोकळे, गणेश पोकळे,काकासाहेब पोकळे,सागर नन्नवरे,मिरा थोरात,अमृपाली चव्हाण यांनी स्वागत केले. याप्रसंगी अमरापूर ▶▶ उर्वरित पान २ वर



*अखेर मनसेच्या मागणीला यश. उमाकिरण संकुल येथे खाजगी क्लासेस च्या नावाखाली चालू असलेल्या घाणेरड्या कृत्याचा निषेध व्यक्त करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने बीड जिल्हा पोलीस अधीक्षकांना आरोपी नराधम विजय पवार व खटावकर यांना दोन दिवसात तात्काळ अटक करा . नसता एक जुलै रोजी जिल्हा पोलीस अधीक्षिक कार्यालयासमोर धरणे आंदोलन करणार अशा स्वरूपाचे निवेदन देण्यात आले होते. अखेर मनसेच्या मागणीला यश आरोपी विजय पवार व खटावकरला दोन दिवसात पोलीस प्रशासनाने अटक केले. पोलीस प्रशासनाचे अभिनंदन.*

# शिवसैनिकांकडून हिंदी सक्ती च्या आदेशाची होळी

## मराठी आमची माता तिला माँ होऊ देणार नाही : उल्हास गिराम

**बीड । प्रतिनिधी**

इयत्ता पहिली पासून हिंदी विषयाची सक्ती बळजबरी लादणाऱ्या सरकारच्या या आदेशाची होळी शिवसैनिकांनी बीड मध्ये केली. शिवसेना पक्ष प्रम ुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार, मुख्य प्रदोत संपर्क नेते सुनिलजी प्रभू, उपनेत्या तथा प्रवक्त्या सुषमाताई अंधारे, संपर्क प्रमुख परशुरामजी जाधव साहेब यांच्या मार्गदर्शन नुसार आज




जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या नेतृत्वा खाली शिवसैनिकांनी आज या आदेशाची होळी केली. यावेळी उल्हास गिराम म्हणाले की, 'म राठी ही आमची मातृभाषा- माता आहे तिला आम्ही माँ होऊ देणार नाहीत'.केंद्र शासनाच्या नव्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात जागतिक योग सप्ताह संपन्न

**नेकनूर । प्रतिनिधी**

माऊली विद्यापीठ केज संचलित, प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, नेकनूर क्रीडा विभागा अंतर्गत जागतिक योग सप्ताह क्रीडा विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रीकृष्ण जाधव यांच्या संचालनाने घेण्यात आला. सात दिवशीय योगाचे प्रात्यक्षिक प्रा. डॉ. जाधव जे. के. यांनी महाविद्यालयीन प्राध्यापक व विद्यार्थ्यांना दिले. भारतीय धर्म संस्कृतीमधील योग संकल्पनेची मांडणी श्रीमद्भगवद्गीता ग्रंथात केलेली आहे. त्याच जोडीने भगवान पतंजली मुनी यांनी आपल्या योगसूत्राद्वारे मानवाच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक



विकासाची संकल्पना स्पष्ट केली आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला होता. ▶▶ उर्वरित पान २ वर



*माजलगाव: येथील नवीन मोंढ्यामध्ये गोविंद साळुंके व मुकुंद चौधरी यांच्या सिंदफणा ट्रेडिंग कंपनी व धान्य स्वच्छता,प्रतवारी केंद्र या उपक्रमाच्या उदघाटन सोहळ्यास उपस्थित माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके,गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित,माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, राहुल जगताप,डॉ.उद्धव नाईकनवरे,संतोष यादव, जुगलकिशोर नावंदर, नंदकिशोर सचगणे,पाशाभाई इत्यादी उपस्थित होते.*

# शिवसेना वर्धापन दिनानिमित्त ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेनेचा वर्धापन दिन यंदा सामाजिक उपक्रमाने साजरा करत शिवसैनिकांनी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवासात हातभार लावण्याचा स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आला. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शिवसेना तालुका प्रमुख संतोष जाधव व सर्व शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या पुढाकाराने काल दि. २७ जून २०२५ रोजी दुपारी



१२ वाजताच्या दरम्यान जि.प. शाळा महाजनवाडी, पिंपरणई, कोंबडवस्ती व लिंबागणेश गट या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोफत वह्या व शालेय साहित्याचे ▶▶ उर्वरित पान २ वर

